# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) -2024

## सराव परीक्षा प्रश्नपत्रिका क्र. 2

वेळ : 11.00 ते 12.30

पेपर क्र. 1    विषय : प्रथम भाषा व गणित    माध्यम : मराठी    एकूण गुण : 150

बैठक क्रमांक : | | | | | | | | | | |

---

**विभाग क्र. 1**

**मराठी**

**प्रश्न 1 ते 3 साठी सूचना -**

**पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे पर्यायातून निवडा.**

सातशे वर्षापूर्वी जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणारे ज्ञानेश्वर आबालवृद्धापर्यंत सगळ्यांनाच समजले. परंतु हजारो वर्षापासून काळ्या मातीच्या ढेकळातून चालताना जगाच्या पोटासाठी घासाचं दान देणारा, कोरड्या कंठासाठी आभाळा कडं पाण्याचं वरदान मागणारा आणि ऐन दुष्काळातही इथल्या प्रत्येक जीवाला पसा-पसा का होईना दान देणारा, कोरड्या कंठासाठी आभाळाकडं पाण्याचं वरदान का होईना दान देणारा 'बळीराजा' नावाचा ज्ञानेश्वर मात्र आपल्याला समजला नाही. सध्याच्या वर्तमानात या 'बळीराजाचं पसायदान' समजून घेणं अत्यंत गरजेचं आहे.

शेतात असेपर्यंत कणसं पाखरांसाठी, कडबा-वैरण जनावरांसाठी, काढणी अन् मळणी करतांना सांडलेलं किडा-मुंगीसाठी, घरात आणल्यावर काही उंदरांसाठी अन् बाजारात पाठवलेलं सारं माणसांसाठी ... हे बळीराजानं इथल्या प्राणीमात्रांसाठी दिलेलं पसायदान आहे.

1. उताऱ्यात आलेला 'पसा' या शब्दाचा योग्य अर्थ कोणता?

   1) व्रत  2) दान  3) ओंजळ  4) कल्याण

2. जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणारे कोण?

   1) संत तुकाराम  2) संत एकनाथ  3) संत ज्ञानेश्वर  4) संत नामदेव

3. बळीराजा कोणास म्हटले आहे?

   1) ज्ञानेश्वरास  2) कामगारास  3) धनिकास  4) शेतकऱ्यास

4. पुढील शब्दाचा योग्य समानार्थी शब्द निवडा.

   मोल

   1) अमोल  2) किंमत  3) दर्जा  4) अनमोल

5. खाली दिलेल्या वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह वापराल? योग्य पर्याय निवडा.

   1) मी जाऊ का गावाला

   1) पूर्ण विराम  2) अर्धविराम  3) प्रश्नार्थक चिन्ह  4) उद्गारवाचक चिन्ह

6. खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.

   1) चॅट-गप्पा  2) स्क्रीन-पडदा  3) मेसेज-संदेश  4) इंटरनेट-मोबाईल

---

7. पुढील शब्दसमुहासाठी योग्य शब्द निवडा.

केलेले उपकार जाणणारा

1) कृतज्ञ 2) स्वार्थी 3) कृतघ्न 4) विसरभोळा

8. 'पक्षी' या शब्दाचे योग्य अनेकवचन असलेला पर्याय खालीलपैकी कोणता?

1) पक्ष 2) पक्षे 3) पक्ष्या 4) पक्षी

**प्रश्न.9 ते 11 साठी सूचना-**

खाली वाक्यांचा एक सुसंगत परिच्छेद दिला आहे तो पूर्ण होण्यासाठी रिकाम्या जागी येणाऱ्या शब्दांचा पर्याय निवडा.

9. महाराष्ट्राच्या भूमीत अनेक----------- होऊन गेले.

1) महंत 2) संत 3) वीर 4) पुरुष

10. त्यांनी तेथे ---------काम केले.

1) लोकजागृतीचे 2) लढाईचे 3) प्रवचनाचे 4) शिक्षणाचे

11. लोकांना अज्ञान व ---------पासून दूर ठेवले.

1) डोळसपणा 2) आंधळेपणा 3) शिक्षणा 4) अंधश्रद्धे

12. खालील वाक्य भूतकाळी करण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

मुले एका सुरात राष्ट्रगीत

1) म्हणतील 2) म्हणत होती 3) म्हणत असतील 4) म्हणत आहेत

**2**

13. पर्यायातील शब्दांचा वर्णमालेनुसार क्रम लावल्यास दुसरा शब्द कोणता येईल ?

1) गोड 2) खारट 3) [illegible] 4) कडू

14. खालील अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द बनवा व त्याचे डावीकडून तिसरे अक्षर ओळखा.

म त हा भा र

1) त 2) र 3) भा 4) हा

15. प्राणी व त्यांचा निवारा यांची योग्य जोडी असलेला पर्याय निवडा.

1) मधमाशी - जाळे 2) सिंह - ढोली

3) घोडा - तबेला 4) कासव - बीळ

16. 'दररोजचा ठरलेला कार्यक्रम' या शब्दसमूहासाठी योग्य शब्दाचा पर्याय निवडा.

1) दिनमान 2) दिनक्रम 3) प्रातःकाल 4) नाटक

17. 'अनिष्ट' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

1) वाईट 2) व्रात्य 3) शिष्ट 4) इष्ट

18. 'अग्निपंख' हा अमूल्यग्रंथ कोणाचा आहे?

1) पु. ल. देशपांडे 2) प्र.के. अत्रे 3) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन 4) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम

19. खाली दिलेल्या वाक्प्रचाराच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा

हिरमोड होणे

1) नाराज होणे 2) मोडून टाकणे 3) अडचण येणे 4) मोडकळीस येणे

20. श्लोक सकाळी पाच वाजता <u>उठतो</u>. वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

1) नाम 2) सर्वनाम 3) विशेषण 4) क्रियापद

**प्र.21 ते 23 साठी सूचना :**

**पुढील बातमी काळजीपूर्वक वाचून विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा.**

राष्ट्रीय स्मारकांमध्ये प्लास्टिक बंदी

नवी दिल्ली,

'स्वच्छ भारत स्वच्छ स्मारक' मोहिमेचा भाग म्हणून देशातील सर्व राष्ट्रीय स्मारके तसेच पर्यटन स्थळांवर प्लास्टिक बंदीची घोषणा करण्यात आली. काल दिल्ली येथे केंद्रीय पर्यटन मंत्र्यांनी महात्मा गांधी जयंतीचा मुहूर्त साधून ही घोषणा केली. सर्व राष्ट्रीय स्मारकांच्या परिसरात संपूर्ण प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी महिनाभरात करण्याचे तसेच या ठिकाणी स्वच्छतागृह व उपहारगृहाची सुविधा पुरविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

21. 'प्लास्टिक बंदी' हा कोणत्या मोहिमेचा भाग आहे?

1) स्वच्छ भारत, सुंदर भारत
2) स्वच्छ भारत, स्वच्छ स्मारक
3) स्वच्छ भारत, आमचा भारत
4) स्वच्छ स्मारक, स्वच्छ पर्यटन

22. या माहिमेअंतर्गत कोणत्या सुविधा पुरविण्याचे निर्देश दिले आहेत?

अ) स्वच्छता गृह ब) उपहार गृह क) प्लास्टिक वस्तू

1) फक्त 'ब'
2) 'अ', 'ब' आणि 'क'
3) फक्त 'क'
4) फक्त 'अ' आणि 'ब'

23. मोहिमेची घोषणा कोणत्या दिवशी केली?

1) ३ ऑक्टोबर 2) ३१ जुलै 3) २ ऑक्टोबर 4) १ ऑगस्ट

24. खाली दिलेल्या अर्थाची म्हण पर्यायातून निवडा.

'त्रास सहन केल्याशिवाय मोठेपण मिळत नाही.'

1) प्रयत्नांती परमेश्वर
2) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.
3) करावे तसे भरावे
4) पेराल ते उगवेल.

25. पुढील वाक्यातील उद्देश भाग पर्यायातून ओळखा.

'आई-वडिलांच्या मायेला समीर पारखा झाला.'

1) आई-वडिलांच्या 2) मायेला 3) आई-वडिलांच्या मायेला 4) समीर

****

## विभाग क्र. 2

## गणित

26. L, D, C, M ह्या रोमन संख्या उतरत्या क्रमाने लिहा.

(1) MCLD (2) MDLC (3) LCDM (4) MDCL

27. बारा लक्ष बाराशे बारा

(1) 121212 (2) 1201212 (3) 12001312 (4) 121312

28. ------------या सहा अंकी संख्येतील सर्व अंक समान असून त्या सर्व अंकांच्या दर्शनी किंमतीची बेरीज 18 आहे. यातील शतक व हजार स्थानच्या स्थानिक किंमतीचा गुणाकार किती?

(1) नऊ हजार (2) नऊ दशहजार (3) नऊ लक्ष (4) नऊ दशलक्ष

29. 1 ते 100 मध्ये 1 नसलेल्या संख्या किती ?

(1) 20 (2) 71 (3) 72 (4) 80

30. दोन अंकी मूळ संख्या किती ?

(1) 20 (2) 22 (3) 21 (4) 25

31. 12642, 85521, 54829, 782899, 352749 या संख्यांचा चढता क्रम लावल्यास तिसऱ्या संख्येतील सहस्त्र स्थानाचा अंक कोणता येईल?

(1) 5 (2) 4 (3) 2 (4) 6

32. पावणे चारशे + साडे पाच हजार + 101 हजार = ?

(1) 160875 (2) 186075 (3) 1 0 6 8 7 5 (4) 1160875

33. 623 □ 00- 516304 = 106996 चौकटीत कोणता अंक येईल ?

(1) 2 (2) 6 (3) 4 (4) 3

34. आठ हजारातून किती वजा करावेत म्हणजे (4945-1445) यांच्या वजाबाकी इतके उत्तर येईल ?

(1) 4500 (2) 2500 (3) 5000 (4) 3500

35. 15 शतक x 8 शतक = किती?

(1) 120 (2) 12000 (3) 120000 (4) 1200000

36. 50 रु. च्या बंडलमध्ये असणाऱ्या काही नोटांची एकूण किंमत खालीलपैकी काय असू शकेल?

(1) 4510 (2) 9595 (3) 6050 (4) 10010

37 "4664 ÷ 4" या उदाहरणामध्ये भाजक '4' ने वाढवल्यास येणारा भागाकार हा कितीने कमी किंवा जास्त येईल?

(1) 583 ने जास्त (2) 583 ने कमी (3) 1166 ने जास्त (4) 1166 ने कमी

38 9 x 0 + 11 □ 121 ÷ 11+ 0 चौकटीत पर्यायापैकी कोणते योग्य चिन्ह येईल?

(1) $<$ (2) $\wedge$ (3) $>$ (4) $=$

39. खालीलपैकी चुकीचे विधान कोणते?

(1) 12 हा 96 चा विभाजक नाही (2) 36 हा 9 आणि 4 चा सामाईक विभाज्य आहे

(3) 98 हा 14 चा विभाज्य आहे (4) 16 हा 176 चा विभाजक आहेत

40. 1 ते 100 मधील 15 ने तसेच 12 ने विभाज्य असलेल्या एकूण संख्या किती?

(1) 10 (2) 12 (3) 13 (4) 14

41. $\frac{648}{2017} + \frac{669}{2017} + \frac{700}{2017} =$

(1) 0 (2) $\frac{2027}{2017}$ (3) 1 (4) $\frac{2017}{6051}$

42. $\frac{2}{9}, \frac{2}{5}, \frac{2}{11}, \frac{2}{7}$ हे अपूर्णांक उतरत्या क्रमाने लिहा.


(1) $\frac{2}{11}, \frac{2}{7}, \frac{2}{9}, \frac{2}{5}$ (2) $\frac{2}{5}, \frac{2}{9}, \frac{2}{7}, \frac{2}{11}$

(3) $\frac{2}{5}, \frac{2}{7}, \frac{2}{9}, \frac{2}{11}$ (4) $\frac{2}{11}, \frac{2}{9}, \frac{2}{7}, \frac{2}{5}$

43. $\frac{9 \times 9 \div 9 \times 9}{5 \times 5 \div 5 \times 5}$ या अपूर्णांकाचा सममूल्य अपूर्णांक शोधा

(1) $\frac{1}{1}$ (2) $\frac{9}{5}$ (3) $\frac{162}{50}$ (4) $\frac{18}{25}$

44. खालील कोणता अपूर्णांक आकृतीत दाखवलेल्या अपूर्णांकाचा सममूल्य अपूर्णांक दर्शवितो



(1) $\frac{1}{5}$ (2) $\frac{15}{75}$

(3) $\frac{32}{80}$ (4) $\frac{10}{15}$

**5**

45. $\frac{5}{4} + \frac{4}{3} + \frac{3}{2}$ किती?

(1) $\frac{12}{9}$ (2) $12\frac{1}{4}$ (3) $4\frac{1}{24}$ (4) $4\frac{1}{12}$

46. $\frac{1}{5} + \frac{2}{5} + \frac{3}{5} + \frac{4}{5} + \frac{5}{5} =$ किती?

(1) 4 (2) 3 (3) 2 (4) 1

47. आयेशाने दुकानातून साडे सोळा रुपयाचे बिस्किटे साडे बेचाळीस रुपयाचे दूध आणि साडे एकोणतीस रुपयाचे बटर घेतले व दुकानदाराला शंभर रुपयाची नोट दिली तर दुकानदार आयेशाला किती रुपये परत करेल?

(1) ₹11.00 (2) ₹11.50 (3) ₹89.00 (4) ₹88.50

48. एक गाडी 3 तासांत 120 कि.मी. अंतर पार करते. तर मी याच वेगाने साडेपाच तासांत किती अंतर जाईल?

(1) 200 कि.मी. (2) 240 कि.मी. (3) 160 कि.मी. (4) 220 कि.मी.

49. पावणे तेरा लीटर म्हणजे किती मिलिलीटर ?

(1) 13750 मि.ली. (2) 12550 मि.ली. (3) 12750 मि.ली. (4) 12250 मि.ली.

50. 4 तास 30 मि. - 2 तास 45 मि. = किती?

(1) 2 तास 45 मि. (2) 1 तास 45 मि. (3) 2 तास 15 मि. (4) 1 तास 15 मि.

51. स्वातंत्र्यदिन जर बुधवारी आहे. तर शिक्षक दिनाचा वार कोणता?

(1) शनिवार (2) मंगळवार (3) बुधवार (4) गुरुवार

52. कुसुमने 2014 मध्ये बालिका दिनापासून महिला दिनापर्यंत दररोज 2 लीटर दूध घेतले तर तिने एकूण किती लीटर दूध घेतले?

(1) 130 ली. (2) 65 ली. (3) 120 ली. (4) 140 ली.

53. 3 ग्रोस कागदपैकी 4 डझन कागद वापरले तर किती डझन कागद शिल्लक राहिले?

(1) 20 डझन (2) 36 डझन (3) 32 डझन (4) 24 डझन

54. 3600 कागदांचे किती दस्ते कागद होतील?

(1) 180 (2) 160 (3) 170 (4) 150

55. 20 रुपयांच्या 4 नोटा, 5 रुपयांच्या 8 नोटा व 10 रुपयांच्या 9 नोटा मिळून किती रुपये होतील?

(1) 110 (2) 210 (3) 200 (4) 170

56. सागरने एक फ्रिज पावणे बारा हजार रुपयांना घेतला, त्याला वाहतूक खर्च 700 रुपये झाला. तो फ्रिज त्याने पावणे तेरा हजार रुपयास विकला तर नफा किती झाला?

(1) तीनशे (2) साडे चारशे (3) सव्वा तीनशे (4) तीनशे दहा

57. एक डझन पेन्सील प्रत्येकी अडीच रुपये दराने विकत घेऊन त्या सर्व पेन्सिली 27 रुपयास विकल्या तर त्या व्यवहारात तोटा किती रुपये झाला?

(1) 4 (2) 2 (3) 5 (4) 3

58. 150 चा शेकडा 64 किती?

(1) 96 (2) 88 (3) 80 (4) 100

59. एका गोदामात 500 पोती आहेत. त्यापैकी शेकडा 15 टक्के पोती तांदळाची आहेत, तर तांदळाची पोती किती?

(1) 68 (2) 74 (3) 75 (4) 80

60. खालील रेखांकित भागाची शेकडेवारी काढा?



(1) 2% (2) 8% (3) 20% (4) 80%

61. ओंकारने द.सा.द.शे. 10 टक्के दराने 2500 रुपयांचे ६ वर्षाचे सरळव्याज किती?

(1) 1500 रु. (2) 1550 रु. (3) 2600 रु. (4) 1505 रु.

62. मुद्दल साडे सहाशे, दर-दहा रुपये, मुदत-पाच वर्ष, तर सरळव्याज किती?

(1) 225 रु. (2) 425 रु. (3) 325 रु. (4) 525 रु.

63. $\frac{15}{18}, \frac{20}{30}, \frac{9}{10}, \frac{8}{50}, \frac{47}{100}, \frac{961}{1000}, \frac{376}{500}, \frac{96}{10}$

वरील अपूर्णांकातील दशांश अपूर्णांक किती आहेत?

(१) दोन (२) चार (३) पाच (४) सहा

64. रमेशने कपडे शिवण्यासाठी 2 मी. 50 से.मी. कापड आणले, तर त्याने एकूण किती मीटर कापड आणले?

(1) 250 मीटर (2) 2.5 मीटर (3) 250 सेमी (4) 25 मीटर

65. द.सा.द.शे. ५ दराने ८ वर्षाचे १२०० रुपयांचे सरळव्याज किती?

(1) 740 (2) 480 (3) 560 (4) 260

66. बेरीज करा.

सव्वाबारा + साडे बावीस + पावणे दहा

(1) 44.50 (2) 45 (3) 43.50 (4) 45.50

67. घड्याळात 12 वाजले आहेत. तर दोन काट्यांमध्ये किती अंशाचा कोन होईल?

(1) $90^0$ (2) $0^0$ (3) $270^0$ (4) $50^0$


68. 4 बाजूच्या आकृतीत किती शिरोबिंदू आहेत

(1) 10

(2) 11

(3) 12

(4) 13




69. प्रत्येक चौरसाची बाजू 5 से.मी. आहे तर आकृतीची परिमिती काढा.

(1) 12 से.मी.

(2) 36 से.मी.

(3) 24 से.मी.

(4) 60 से.मी.




70. 27.5 से.मी. बाजू असलेल्या चौरसाची परिमिती किती?

(1) 108 से.मी. (2) 110 से.मी. (3) 98 से.मी. (4) 4 से.मी.

71. एका चौरसाकृती वर्ग खोलीची बाजू 6 मीटर आहे. त्या वर्गखोलीला फरशी बसवण्यासाठी एका चौ. मीटरला 20 रुपये याप्रमाणे किती मजुरी द्यावी लागेल.

(1) 720 रु. (2) 20 रु. (3) 36 रु. (4) 640 रु.

72. शेजारील आकृती दुमडून घन बनवल्यास 3 हा अंक असलेल्या पृष्ठाच्या लगतच्या पृष्ठावर कोणता अंक येणार नाही?




(1) 4 (2) 2 (3) 5 (4) 1

73. आकृतीबंध पहा व क्रमाने येणारी संख्या ओळखा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 9 | 16 | 25 | 36 | 49 | ? |

(1) 65 (2) 64 (3) 81 (4) 72

प्रश्न क्र. 74 व 75 साठी सूचना - खालील माहितीच्या आधार प्रश्नांची उत्तरे द्या.

| फळांची नावे | मुलांची संख्या |
|---|---|
| 1) आंबा |  |
| 2) सफरचंद |  |
| 3) केळी |  |
| 4) अननस |  |

प्रमाण 1 चित्र = 20 मुले

74. शाळेतील मुलांना सर्वात जास्त कोणते फळ आवडते?

(1) केळी (2) अननस (3) आंबा (4) सफरचंद

75. सफरचंद आवडणारी व केळी आवडणारी मुलांची एकूण संख्या किती?

(1) 120 (2) 140 (3) 6 (4) 12